बिगारी पदावरुन रोडमुकादम या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत

**नाशिक महानगरपालिका नाशिक**

**सामान्य प्रशासन विभाग**

**राजीव गांधी भवन, मुख्यालय ,शरणपुर रोड, नाशिक-४२२००२**

**दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२२२२४१६**

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ दिनांक ०५/०३/२००२

२) आदेश जा.क्र.आस्था/वशि/१८६८/२०२० दिनांक ०६/०८/२०२०

३) नाशिक महानगरपालिका कर्मचारी निवड समितीची शिफारस

४) शासन निर्णय क्रमांक, दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३३/नवि-२८ दिनांक १६/०४/२०२१

५) शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१

६) शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग -२०१५/प्र.क्र. १७१/१६-अ, दिनांक ०५/०७/२०२१

७) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ दि.२३/०७/२०२१

८) मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली कर्मचारी निवड समितीची अंतिम बैठक दिनांक २६/१०/२०२१

जा.क्र.आस्था/वशि/२४४४/२०२१ दिनांक ०३/११/२०२१

**आदेश**

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६ ब यांच्या शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ प्रलंबित आहे. पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदांवर पदोन्नती ही दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत, असे निर्देश दिलेले आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीनुसार नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील **बिगारी** या संवर्गातील खालील अधिकारी/कर्मचारी यांना **रोडमुकादम** या पदावर वेतनस्तर **एस-३ रु.१६६००-५२४००/-** मध्ये निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव | सध्याचे पदनाम | पदोन्नतीचे पदनाम | स्वत:चा जात प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्री.साबळे अनिल वामन | बिगारी | रोडमुकादम | मराठा स.सा | |
| २. | श्री.चुंबळे विजय राजाराम | बिगारी | रोडमुकादम | शिंपी इमाजा | |
| ३. | श्री.गलांडे कैलास भिकन | बिगारी | रोडमुकादम | माळी इमाजा | |
| ४. | श्रीमती. निकम शैला शेखर | बिगारी | रोडमुकादम | माळी इमाजा | |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव | सध्याचे पदनाम | पदोन्नतीचे पदनाम | स्वत:चा जात प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ५. | श्री.बेंडकुळे बबन सुका | बिगारी | रोडमुकादम | हि.म.कोळी अ.ज. | |
| ६. | श्री.बेंडकुळे राजेश धर्मा | बिगारी | रोडमुकादम | हि.म.कोळी अ.ज. | |

१.उपरोक्त नमुद कर्मचाऱ्यांनी त्यांचे सध्याचे विभागातच कामकाज करावे. पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापनेचे विभाग नेमुन देण्यासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करणेत येतील.

२.वरील अधिकारी/कर्मचारी यांना **रोडमुकादम** संवर्गात खालील अटी-शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

**अटी-शर्ती**

१) संदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

२) सदर कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ८ व १० खाली विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित /न्यायालयीन प्रकरण/FIR दाखल नसल्याच्या अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नत्या देण्यात येत आहेत. तथापि, यापैकी एखाद्या कर्मचाऱ्यावरुध्द या आदेशाच्या दिनांकास विभागीय चौकशी /न्यायालयीन प्रकरण/FIR दाखल असल्यास त्यांच्याबाबतीत हे पदोन्नती आदेश आपोआप रद्द होतील.

३) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२१/०६/२०२१ अन्वये "महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१" प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेतील सर्व अटी व नियम सदर आदेशाद्वारे पदोन्नत होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू राहतील. या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच जेष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

४) उक्त कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवत आहे.

५) सदर पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व विशेष अनुमती याचिका क्र.२५१८१/२०१८ व त्यातील आय.ए.क्र.२५९०/२०१९ मध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

६) सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६,१०८७८, १०९११, १०९०९/२०२१ मध्ये दिनांक २५ मे २०२१ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद (४)- खालीलप्रमाणे निदर्शनास आणण्यात येत आहे.

"4.We make it clear that any promotion, if any that would be made by the state Goverrnment, pursuant to the Interim G.R. dated 7.5.2021 and circular dated 10 May, 2021 shall be subject to the further orders that would be passed by this court at the stage of admission. The promotes, if promoted pursuant to those G.R. dated 7.5.2021 and circular dated 10 May, 2021 respectively shall be informed about the pending proceedings in this court."

७) सदर पदोन्नत्या हया अत्यंत तात्पुरत्या स्वरुपातील असून त्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका स्टॅम्प् क्र.६८१९/२०२१ व इतर याचिकांवर मा.उच्च न्यायालयाने दि.२९/०६/२०२१, दि.०८/०७/२०२१ व दि.२२/०७/२०२१ रोजीच्या व त्यानंतर वेळोवेळी होणाऱ्या आदेशाच्या अधिन राहतील.

८) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३०३/कार्या-१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार "वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर अथवा यापूर्वीच एखाद्या अधिकाऱ्याने पदोन्नतीचे

पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास, त्याचे नाव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचित संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळच्या गुणवत्तेप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांची पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास त्याचा नियमित निवडसूचित समावेश करण्यात येईल" पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारता येणार नाही.

९) सदर आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत पदोन्नतीचा आदेश स्विकारावा जे कर्मचारी आदेश प्राप्त झाल्यानंतर विहित कालावधीत पदोन्नती स्विकारणार नाहीत त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२/०३/२०१९ नुसार सातवा वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत प्रगती योजनेखाली मंजूर केलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसुली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम १२ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

१०) मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे बाबतीत जातपडताळणी संदर्भात भविष्यात वाद निर्माण झाल्यास संबंधित कर्मचारी जबाबदार राहील व चौकशी अंती संबंधित कर्मचाऱ्याचे जातीचा दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येऊन त्यांना पदावनत केले जाईल.

११) सदरची पदोन्नतीने नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून प्रस्तावित नाशिक महानगरपालिका सेवाप्रवेश नियम २०१४ मध्ये किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदे निरसित झाल्यास तसेच मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या परिणामस्वरुप किंवा राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांच्या परिणामस्वरुप तात्पुरत्या दिलेल्या पदोन्नत्या कायम होऊ न शकल्यास आणि पदोन्नत कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याची वेळ आल्यास First Come Last Go या पध्दतीने पदोन्नती पूर्वीच्या पदावर पदावनत करण्यात येईल.

१२) सदर पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर आदेशाची नोंद संबंधितांचे सेवापुस्तकांत घेण्यात यावी.

आयुक्त 02/11/2021

नाशिक महानगरपालिका नाशिक

**प्रत रवाना**

१) ................................................

२) संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुख

३) लेखापरिक्षण/मुख्य वित्त व लेखा विभाग

४) आदेश फाईल

५) स्थळ प्रत